# जाहिर प्रकटन

केंद्रशासनाच्या प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत **चऱ्होली व बोऱ्हाडेवाडी** येथे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी घरे बांधणे प्रकल्प राबविण्यात आले आहेत. सदर **प्रकल्पातील दिव्यांग प्रवर्ग व अनु. जमाती प्रवर्गातील रिक्त असणाऱ्या सदनिकांकरिता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील रहिवासी असणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक प्रवर्गात प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य** असे अर्ज मागवून, अर्ज छाणणी करुन लाभार्थी निश्चित करणेचे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे नियोजन आहे.

सदर प्रकल्पांची संक्षिप्त माहिती खालीलप्रमाणे आहे.

| **प्रकल्पाचे नाव** | **एकुण सदनिका संख्या** | **लाभार्थी हिस्सा प्रति सदनिका र.रु.** | **केंद्र शासन हिस्सा प्रति सदनिका र.रु.** | **राज्य शासन हिस्सा प्रति सदनिका र.रु.** | **एकुण प्रति सदनिका किंमत र.रु.** |
|---|---|---|---|---|---|
| चऱ्होली | ४५ | ६,६९,००० | १,५०,००० | १,००,००० | **९,१९,०००** |
| बोऱ्हाडेवाडी | ३० | ६,२१,००० | १,५०,००० | १,००,००० | **८,७१,०००** |

**<u>सदर प्रकल्पांकरिता सर्वसाधारण अटी व शर्ती खालीलप्रमाणे असणार आहे.</u>**

अ) सदर प्रकल्पांसाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील नागरिक अर्ज करु शकतात.

ब) प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य दिले जाईल.

क) सदर योजनेसाठी ज्या अर्जदारांचे कागदपत्रे पुर्ण असतील अशा अर्जदारांना फॉर्म दिला जाईल.

**ड) अर्जदारांना झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन विभाग २०५ व्यापारी संकुलन,भाजी मंडईशेजारी चिंचवडगाव पुणे – ४११०३३ येथे अर्ज करण्यासाठी स.१०.३० ते साय.५ वा. या वेळेत अर्ज उपलब्द होतील.**

१) **सदर प्रकल्पांतील सदनिकांचे आरक्षणनिहाय माहिती खालीलप्रमाणे आहे.**

| **प्रकल्पाचे नाव** | **सर्वसाधारण (Open) ५०%** | **अनुसूचित जाती (SC) १३%** | **अनुसूचित जमाती (ST) ७%** | **इतर मागास प्रवर्ग (OBC) ३०%** | **एकुण** |
|---|---|---|---|---|---|
| **चऱ्होली** | - | - | १२ | - | **१२** |
| दिव्यांग प्रवर्ग (PH) | २० | - | ४ | ९ | **३३** |
| **एकुण** | **२०** | **-** | **१६** | **९** | **४५** |
| **बोऱ्हाडेवाडी** | - | - | ६ | - | **६** |
| दिव्यांग प्रवर्ग (PH) | १२ | ७ | ५ | - | **२४** |
| **एकुण** | **१२** | **७** | **११** | **-** | **३०** |

२) सदर प्रकल्पांसाठी अर्ज करणेस व अनामत रक्कम भरणेकामी नागरिकांना **दि.०६/०३/२०२४** ते **दि.१५/०३/२०२४** पर्यंत (७ दिवस) कालावधी देण्यात येईल. सदर कालावधीत प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य अर्ज केलेल्या नागरिकांचे पात्रतेविषयक कार्यवाही पुर्ण करण्यात येईल.

३) सदर नागरिकांकडून अर्जासोबत र.रु.१०,०००/- इतकी अनामत रक्कम घेण्यात येणार आहे.

४) चऱ्होली व बोऱ्हाडेवाडी येथील प्रकल्पांकरिता अर्ज करणेकामी नागरिकांना खालील तक्त्यामधील नमुद कागदपत्रे सादर करावे लागणार आहेत.

| अ.क्र. | कागदपत्रे |
|---|---|
| १ | उत्पन्न दाखला, तहसिलदार यांचे स्वाक्षरीने (सन २०२२-२३ आर्थिक वर्ष) किंवा १ वर्षाचा इनकम टॅक्स रिटर्न (ITR) किंवा फॉर्म १६/१६अ (सन २०२२-२३ आर्थिक वर्ष) |
| २ | जात प्रमाणपत्र (अनुसूचित जाती, जमाती, वि.जा.भ.ज., इतर मागासवर्गीय) (फक्त अर्जदाराचे, कुटुंबातील इतर सदस्यांचे प्रमाणपत्र ग्राह्य धरले जाणार नाही) - फक्त महाराष्ट्रातील रहिवासी |
| ३ | जात वैधता प्रमाणपत्र - फक्त अर्जदाराचे (उपलब्ध असल्यास) |
| ४ | आधार कार्ड (अर्जदार व कुटुंबातील सर्व सदस्यांचे) |
| ५ | पॅनकार्ड (अर्जदार व सह अर्जदार) |
| ६ | बँक पासबुक (अर्जदार) पासबुक खाते तपशिल पृष्ठ व रद्द केलेला चेक |
| ७ | मतदान ओळखपत्र (अर्जदार) |
| ८ | भाडे करार (नोंदणीकृत / नोटरी – किमान र.रु.५००/- च्या स्टॅम्प पेपरवर)<br>संमतीपत्र (नातेवाईकांकडे राहत असल्यास त्यांचे किमान र.रु. १०० च्या स्टॅम्प पेपरवरील संमतीपत्र) |
| ९ | विज बिल (चालु महिन्याचे राहत्या पत्त्यावरील) |
| १० | अधिवास प्रमाणपत्र (डोमिसाईल दाखला) – फक्त महाराष्ट्रातील रहिवासी |
| ११ | दिव्यांग प्रमाणपत्र (जर अर्जदार दिव्यांग प्रवर्गामध्ये असेल तरच) |

५) प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत निश्चित यादीमध्ये नाव आलेल्या लाभार्थ्यांच्या नावे किंवा कुटुंबातील सदस्यांच्या नावे संपुर्ण भारतात पक्के घर नसावे. जर आढळल्यास सदर लाभार्थ्याचे नाव निश्चित यादीमधून वगळण्यात येईल.

६) सदर प्रकल्पांकरिता अर्ज करणारा नागरीक हा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील रहिवासी असणे आवश्यक आहे.

७) प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत अर्ज करताना अर्जदार जर महिला असेल तर जात प्रमाणपत्र सुध्दा त्यांचेच सादर करावा लागणार. इतर कुटुंबातील सदस्यांचे जात प्रमाणपत्र ग्राह्य धरले जाणार नाही.

८) प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत अर्ज करताना अर्जदार महिला जर लग्नाच्या अगोदर अर्ज केला असेल आणि दरम्यानच्या काळात त्यांचे लग्न झाले असतील तसेच अर्जदार महिला लग्नाच्या अगोदर अर्ज करताना जे नाव नमुद केली असेल तर नाव बदल झालेबाबत मुळ गॅजेट व मुळ मॅरेज सर्टिफीकेट सादर करावा लागणार आहे.

९) प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत अर्ज करताना ज्या नागरिकांनी SBC प्रवर्गातून अर्ज केला असेल आणि त्यांचे नाव निश्चित यादीमध्ये OBC प्रवर्गामध्ये निवड झाला असेल आणि जर सदर अर्जदार SBC चे जात प्रमाणपत्र सादर करत असेल तर तो अर्जदार ग्राह्य धरला जाणार आहे.

१०) सदर प्रकल्पाकरिता अर्जामध्ये माहिती नमुद करताना नागरिकांकडून कोणतीही चूक (उदा. नाव, जात आरक्षण माहिती, उत्पन्न, दिव्यांग बाबत माहिती इ.) झाल्यास त्यास सर्वस्वी अर्जदार जबाबदार राहणार आहे.

११) लाभार्थी स्वहिश्श्याच्या १०% रक्कम सोडतीनंतर १५ दिवसांच्या आत भरल्यानंतरच सदनिका वाटपपत्र (Allotment Letter) देण्यात येईल.

१२) तदनंतर उर्वरित ९०% रक्कम १ महिन्याच्या आत भरावयाचे आहे. तसेच सोडतीनंतर ४५ दिवसाच्या आतमध्ये संपूर्ण रक्कम भरणा करणे बंधनकारक राहील.

१३) उर्वरित ९०% रक्कम भरणेकामी बँक लोन करुन घेणे ही सर्वस्वी लाभार्थ्याची जबाबदारी असून यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिका कुठलीही हमी घेणार नाही.

१४) लाभार्थ्यांना लोन करिता आवश्यक असलेले No Objection Certificate (NOC) देणेकामी बँकेमार्फत Loan Sanction Letter महानगरपालिकेस प्राप्त झाल्यानंतर लाभार्थ्यांस महानगरपालिकेमार्फत No Objection Certificate (NOC) देण्यात येईल.

१५) जर लाभार्थ्यांचे लोन होणेकामी काही अडचणी असल्यास व लोन करिता आवश्यक असलेल्या Cibil Score चा काही अडचण असल्यास त्यांनी परस्पर बँकेशी संपर्क साधावा. सदर कारणांमुळे लाभार्थ्यांचा लोन होण्यास काही अडचण आल्यास त्यास महानगरपालिका जबाबदार राहणार नाही. तसेच होम लोन किंवा स्वहिस्सा रक्कम मुदतीत न भरल्यास लाभार्थ्यांचा लाभ रद्द करण्यात येणार आहे.

१६) अंतिम यादी प्रसिध्द केल्यापासुन १५ दिवसाच्या आत लाभधारकाने स्वहिश्श्यामधील १०% रक्कम न भरल्यास किंवा लाभधारकाने सदनिका Surrender केल्यास त्याचा लाभ रद्द करण्यात येईल.

१७) तसेच आवश्यक कागदपत्रे (उदा. जातीचा दाखला), योजनेचे पात्रतेचे निकषाची पुर्तता न केल्यास तथा सदनिकेची रक्कम निर्धारित टप्प्यानुसार न भरल्यास लाभार्थ्यांचा लाभ रद्द करणेत येईल.

१८) लाभार्थ्यांनी स्वहिस्सा रक्कम न भरलेस सदर लाभार्थ्यांचा लाभ रद्द करुन पुन्हा प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्वानुसार प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गतच्या मार्गदर्शक सूचनानुसार पात्र होणाऱ्या लाभार्थ्यांना सदनिका वितरित करणेत येतील.

१९) जर लाभार्थ्यांने सदनिकेचा ताबा घेणेपर्यंत स्वहिस्सा रक्कम भरलेनंतर सदनिका घेणेस इच्छुक नसेल तर Cancellation Charges म्हणून स्वहिस्सा रकमेमधील १०% रक्कम वजावट करणेत येईल व उर्वरित रक्कम लाभार्थ्यास देणेत येईल.

२०) प्रधानमंत्री आवास योजनेच्या वेळोवेळी जाहिर केलेल्या तरतुदीनुसार असल्याने १० वर्षांपर्यंत सदनिकेची विक्री करता येणार नाही. अगर भाडे पट्ट्याने देता येणार नाही. सदनिकेची अनधिकृत विक्री, हस्तांतरण झाल्याचे आढळून आल्यास लाभार्थ्यांविरुध्द कायदेशीर कारवाई केली जाईल. तसेच १० वर्षांनंतर सदनिका विक्री करावाचे झाल्यास त्यावेळच्या बाजारभावानुसार सदर सदनिकेच्या जमिनीच्या ५०% रक्कम पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस देणे क्रमप्राप्त आहे.

२१) सदर सदनिका वाटप नियमावली मध्ये बदल किंवा वाढ करण्याचे अधिकार हे मा.महापालिका आयुक्त यांना राहतील.

सही/-

आयुक्त

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी - ४११०१८